साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :-प्रशांत वासुदेव कुंभारे
वय ३६ वर्ष, व्यवसाय-पो.कॉन्स्टेबल
राह.पो.स्टे.बेला, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. दि.२१/१०/२०२३ रोजी मी ट्राफिक पोलिस म्हणुन बेला येथे कर्तव्यावर होतो. सदर दिवशी आमचे वरिष्ट ठाणेदार साहेब यांनी आमची ड्युरी सरप्राईज नाकाबंदी म्हणुन लावली. त्यावेळी आम्ही नाकाबंदी करत असतांना एक इसम दारू पिउन लोकांना शिवीगाळ व आरडाओरडा करतांना दिसुन आला. त्यानंतर आम्ही त्याला पंचासमक्ष ताब्यात घेतले व पंचांना त्याच्या तोंडाचा वास घ्यायला लावला असता त्याच्या तोंडाचा दारूचा वास आला. त्यानंतर आम्ही आरोपीला प्राथमिक आरोग्य केंद्र बेला येथे उपचाराकामी नेले. त्याठिकाणी त्याची तपासणी केली असता आरोपी दारू पिल्याचे दिसून आले व तशी पावती घेतली. त्यानंतर आरोपीच्या रक्ताचे नमुने हस्तगत केले. त्यानंतर पो.स्टे.ला फिर्याद दिली. सदर घटना ही जैतापूर फाटा, बेला येथील आहे. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **निशाणी क्र.१६** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **निशाणी क्र.१७** देण्यात आला.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. श्रीमती एस.जी.रामटेके यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. मी बेला पो.स्टे.येथे सन २०२२ पासून कार्यरत आहे. मी नाकाबंदी करण्याकामी खाजगी वाहनाने गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा व्हीडीओ बनवत असल्याचा संशय आल्याने मी त्याच्याविरूध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की,मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी दारू पिउन आरडाओरडा,शिवीगाळ करित होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा चौकशी अहवाल दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की,आजरोजी मी आरोपीविरूध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. | समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.२३.०६.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड